त्वर्य/महत्वाचे

आस्थापना विभाग कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र.:-आस्था/ ४५०५
दिनांक :- २४/०८/२०२१

मा.उप आयुक्त परिमंडळ क्र १ ते ५
मा.शिक्षणाधिकारी (माध्यमिक व तांत्रिक)
मा.शिक्षण प्रमुख शिक्षण मंडळ
मा.आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका

यांजकडेस सविनय सादर....

विषय:- कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळाच्या तक्रारींची चौकशी करणेसाठी प्रत्येक कार्यालयात " अंतर्गत तक्रार समिती गठित" करणेबाबत.

संदर्भ:- १) आमचे कार्यालयाकडील जा.क्र.आस्था/७५८ दि.०८/०५/२०१५.
२) आमचे कार्यालयाकडील जा.क्र.आस्था/१६ दि.०१/०४/२०२१.
३) महिला व बाल विकास यांचेकडील शासन निर्णय क्रमांक - मकचौ-२०१३/प्र.क्रं.३/मकक दि.१९/०६/२०१४.
४) १० ऑगस्ट रोजीची Gmail ची प्रत.

विषयांकित प्रकरणी पुणे महानगरपालिकेमध्ये कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळाच्या तक्रारींची चौकशी करणेसाठी प्रत्येक कार्यालयात " अंतर्गत तक्रार समिती गठित" करणेबाबत आपणांस संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार आपले स्तरावर विषयांकित समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीचा कार्यकाळ ३ वर्षे पूर्ण झाला असून नविन सदस्यांची नेमणूक करणेस संदर्भ क्र. २ अन्वये आपणांस कळविण्यात आले होते. विषयांकित समिती अद्याप पर्यंत गठित केली नसल्यास ती तत्काळ गठित होण्याचे दृष्टीकोनातून आपण संबंधितांना त्वरित आदेश देऊ न त्वर्येने संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयानुसार समिती गठित करण्याची कार्यवाही सत्वर पुर्ण करावी.

लैंगिक छळापासून संरक्षणासाठी समिती स्थापन न केल्यास येत्या एक सप्टेंबरपासून रक्कम रूपये ५० हजारांचा दंड आकारण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा महिला व बाल विकास कार्यालयाच्या वतीने देण्यात आली आहे. समिती गठित केल्याचा अहवाल येत्या ३० ऑगस्टपर्यंत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय ,गुलमर्ग पार्क हौंसिग सोसायटी ,तिसरा मजला, विजय बेकरीजवळ , सोमवार पेठ, पुणे-४११०११ या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे, अशी माहिती संदर्भ क्र. ४ अन्वये प्राप्त झाली आहे. याबाबत आपणांस अवगत करीत आहोत.

तरी, ज्या कार्यालयीन आदेशान्वये आपले विभागाकडील समिती गठीत करणेत आलेली आहे त्या आदेशाची प्रत आमचे कार्यालयाकडे आजच पाठविण्याची तजविज करावी हि विनंती .

(प्रकाश पाटील)
सदस्य सचिव
अंतर्गत तक्रार समिती
तथा प्र.प्रशासन अधिकारी,आस्थापना विभाग
पुणे महानगरपालिका